Ohm Dovetail

Ohm Dovetail

## जोडपत्र - 5

### मार्गदर्शन टिपण - गुंतवणूकदारांसाठी एक्सचेंज(जेस)वर ट्रेडिंग करताना काय करावे आणि काय करू नये ह्याकरिता सूचना

**ट्रेडिंग सुरू करण्यापूर्वी**

1. तुम्ही फक्त SEBI नोंदणीकृत मध्यस्थांशी आणि मध्यस्थांमार्फत व्यवहार करण्याची खात्री करा. स्टॉक एक्सचेंजेस www.exchange.com आणि SEBI वेबसाईट www.sebi.gov.in वर उपलब्ध यादीतून तुम्ही SEBI नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक तपासून घेऊ शकता.
2. KYC प्रपत्र पूर्ण भरण्याची आणि KYC प्रपत्रातील कोरी फील्ड्स (रकाने) खोडण्याची खात्री करा.
3. तुम्ही सर्व अनिवार्य प्रपत्रे वाचल्याची खात्री करा, उदाहरणार्थ, हक्क आणि जबाबदाऱ्या, जोखीम प्रकटन प्रपत्र, स्टोक ब्रोकरचे धोरण आणि कार्यपद्धती प्रपत्र.
4. तुमच्यामध्ये आणि स्टॉक ब्रोकरमध्ये मान्य झालेली काही ऐच्छिक कलमे असल्यास ती वाचून समजून घेण्याची खात्री करा आणि मगच त्यावर सही करा. ध्यानात घ्या की तुमच्यामध्ये आणि स्टॉक ब्रोकरमध्ये मान्य झालेली कलमे तुमच्या संमतीशिवाय बदलता येणार नाहीत.
5. ट्रेडिंगसाठी तुम्हाला ब्रोकरने आकारलेले सर्व ब्रोकरेज (दलाली), कमिशन्स, शुल्के आणि इतर आकारण्यांबाबत आणि SEBIने/ स्टॉक एक्सचेंजेसने निर्दिष्ट केलेल्या संबंधित तरतुदींबाबत/मार्गदर्शक सूचनांबाबत स्पष्ट कल्पना असू द्या.
6. तुम्ही निष्पादित केलेल्या दस्तऐवजांची प्रत स्टॉक ब्रोकरकडून विनामूल्य मिळवा.
7. जर तुम्हाला तुमचा बँक आणि डिमॅट अकाऊंट संचालित करण्यासाठी स्टॉक ब्रोकरच्या नावे मुखत्यारपत्र (POA) निष्पादित करायचे असेल तर कृपया ह्या संदर्भात SEBIने/एक्सचेंजेसने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना पहा.

**व्यवहार आणि व्यवहारपूर्ति**

8. तुम्ही लिखित स्वरूपात प्राधिकृत केल्यास स्टॉक ब्रोकर इलेक्ट्रॉनिक कॉंट्रॅक्ट नोट्स (ECN) निर्गमित करू शकेल. त्यासाठी तुम्ही तुमचा ईमेल आयडी स्टॉक ब्रोकरला द्यायला हवा. जर तुम्हाला संगणकाची माहिती नसेल तर तुम्ही ECN पर्याय स्वीकारू नये.
9. तुमच्या इंटरनेट ट्रेडिंग अकाऊंटचा पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका.
10. कुठल्याही स्टॉक ब्रोकरला रोख रक्कम देऊ नका.
11. स्टॉक ब्रोकरच्या नावाने अकाउंट पेयी धनादेश काढा. सब-ब्रोकरच्या नावाने चेक देऊ नका. तुम्ही स्टॉक ब्रोकरला दिलेल्या रकमेचा/रोख्यांच्या जमेचा तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा असल्याची खात्री करून घ्या, ज्यामध्ये दिनांक, स्क्रिप, संख्या, कुठल्या बँक/डिमॅट खात्याच्या नावे रक्कम किंवा रोख्यांची जमा केलेली आहे आणि कुठल्या बँक/डिमॅट खात्यामधून, हा तपशील असेल.
12. व्यवहार पडताळणीची सोय स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट्सवर उपलब्ध आहे, जिथे करारपत्रात दिल्यानुसार व्यवहारातील तपशीलांची पडताळणी होऊ शकेल. जर वेबसाईटवर दिलेले व्यवहाराचे तपशील करारपत्रातील तपशीलांशी जुळत नसतील, तर तावडतोब संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या गुंतवणूकदार गाऱ्हाणी केंद्राशी संबंध साधा.
13. तुम्ही चल खाते (रनिंग अकाऊंट) राखण्याचा विशेष प्राधिकार दिला असल्यास, एक्सचेंजमधून पेआउट मिळाल्यानंतर एका कार्य दिवसात तुमच्यापर्यंत निधी किंवा रोखे (जे काही असेल ते) कदाचित पोचणार नाहीत. म्हणून, पुढील अटींची पूर्तता होत असल्यास, स्टॉक ब्रोकर तुमच्यासाठी रनिंग अकाऊंट राखेल :
   - अ) तुम्ही दिलेल्या अशा प्राधिकारावर फक्त तुम्हीच सही करून तो दिनांकित कराल आणि तुम्ही तो कधीही मागे घेऊ शकता असे कलम त्यामध्ये असेल.
   - ब) निधी आणि रोखे यांची प्रत्यक्ष व्यवहारपूर्ति स्टॉक ब्रोकर तुमच्या पसंतीनुसार किमान तिमाहीतून किंवा महिन्यातून एकदा करेल. खात्याचे व्यवहार पूर्ण करताना, स्टॉक ब्रोकर तुम्हाला खात्यांचे विवरण पाठवील ज्यात पैशासंबंधी ग्राहकाच्या खातेवहीतील उतारा आणि पैसे/रोखे प्राप्त/पोहोचते केल्याच्या नोंदी असतील. ह्या विवरणात निधी किंवा रोखे ठेवून घेतले असल्यास आणि तारण ठेवलेल्या शेअर्सचा तपशीलही असेल.
   - क) व्यवहारपूर्तीच्या दिवशी, थकित दायित्वापोटी आवश्यक रोखे/निधी ठेवून घेईल आणि संभवतः पुढील 5 दिवसांमध्ये डेरिवेटिव मार्जिन दायित्व पूर्ण करण्यासाठी अपेक्षित निधीही ठेवून घेईल, ज्याचा हिशेब एक्सचेंजेसने निर्दिष्ट केलेल्या रीतीने केलेला असेल. रोखीच्या व्यवहारांबाबत स्टॉक ब्रोकर व्यवहारपूर्ति दिनांकास ग्राहकांकडून येणे असलेल्या संपूर्ण पे-इन दायित्वासाठी निधी आणि रोखे राखून ठेवण्याची शक्यता आहे आणि पुढच्या दिवसासाठी आवश्यक असलेल्या व्यापारासाठी तो निधी/ रोखे/ मार्जिन राखून ठेवील अशी शक्यता असते, ज्याचे मूल्य रोख बाजारात अशा व्यवहारपूर्ती दिवशी केलेल्या देवघेवींच्या मूल्याइतके असेल.

Ohm Dovetail

| | |
|---|---|
| ड) खातेवहीतील उतारा किंवा व्यवहारपूर्तीमध्ये काही वाद असल्यास तो तुम्ही लिखित स्वरूपात, असे निधी/रोखे किंवा विवरण जे काही असेल ते मिळाल्याच्या दिनांकापासून शक्यतो कामकाजाच्या 7 (सात) दिवसांच्या आत स्टॉक ब्रोकरच्या नजरेस आणून देणे गरजेचे असते. वाद झाल्यास हे प्रकरण संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या गुंतवणूकदार तक्रार कक्षाला लेखी सादर करावे. | |
| 14. जर तुम्ही चल खाते राखण्याचा पर्याय स्वीकारलेला नसेल, आणि एक्सचेंजेसमधून पेआऊट मिळण्याच्या दुसऱ्या दिवशी तुम्हाला निधीचा/रोख्यांचा पे-आऊट मिळाला नाही तर ही बाब स्टॉक ब्रोकरच्या निदर्शनास आणा. जर काही वाद असेल तर संबंधित स्टॉक एक्सचेंजच्या गुंतवणूकदार तक्रार कक्षाकडे तावडतोब लेखी तक्रार देण्याची खात्री करा. | |
| 15. ट्रेडिंगच्या प्रत्येक दिवसाच्या अखेरीस स्टॉक एक्सचेंजेसकडून एसएमएस किंवा ईमेलद्वारा ट्रेडिंगचे अलर्टस्/व्यवहारांचे तपशील मिळविण्यासाठी तुमच्या स्टॉक ब्रोकरकडे कृपया तुमचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी नोंदवा. | |
| **ट्रेडिंग सदस्यत्व खंडित झाल्यास** | |
| 16. जर एखाद्या स्टॉक ब्रोकरने त्याचे सदस्यत्व प्रत्यार्पित केले, त्याला सदस्यत्वातून निर्यापित करण्यात आले किंवा तो कसूरदार म्हणून घोषित झाल्यास स्टॉक एक्सचेंज एक जाहीर सूचना देते आणि त्याद्वारे फक्त त्या स्टॉक एक्सचेंजच्या "ट्रेडिंग प्रणालीवर निष्पादित व्यवहारांशी" संबंधित दावे गुंतवणूकदारांकडून मागविते. संबंधित स्टॉक एक्सचेंजकडे निर्दिष्ट कालावधीत समर्थनार्थ कागदपत्रांसह दावा सादर करण्याची खात्री करा. | |
| 17. तुम्ही स्टॉक ब्रोकरकडे जमा केलेल्या पैशाला/ रोख्यांना किती संरक्षण आहे हे जाणून घ्या, विशेषत: जर तुमच्या स्टॉक ब्रोकरने कसूर केली किंवा त्याच्या दिवाळखोरीची किंवा नादारीची वेळ आली तर तुम्हाला किती प्रमाणात असे पैसे/ रोखे वसूल करता येतील हे जेथे ट्रेडिंग झाले आहे त्या संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या उपविधींवर आणि नियमावलींवर तसेच वेळोवेळी अंमलात असलेल्या गुंतवणूकदार संरक्षण निधी योजनेवर अवलंबून असू शकते. | |
| **वाद/ तक्रारी** | |
| 18. कृपया ध्यानात घ्या की लवाद कामकाज, ब्रोकर्सच्या विरुद्ध दंडात्मक कारवाई आणि स्टॉक ब्रोकर्सविरुद्ध गुंतवणूकदारांच्या तक्रारी संबंधित स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईट्सवर प्रदर्शित केलेल्या असतात. 19. संबंधित स्टॉक ब्रोकर / सब-ब्रोकर तुमच्या प्रश्नाची/ समस्येची/ तक्रारीची सोडवणूक करीत नसेल तर तुम्ही ते प्रकरण संबंधित स्टॉक एक्सचेंजकडे नेऊ शकता. जर तुमच्या तक्रारीच्या निवारणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर तुम्ही ते प्रकरण वरपर्यंत म्हणजे SEBIकडे नेऊ शकता. | |
| 20. कृपया ह्याची नोंद घ्या की सर्व स्टॉक ब्रोकर्ससाठी/ सब-ब्रोकर्ससाठी SEBIने तक्रारनिवारण विभागाचा/ अनुपालन अधिकाऱ्याचा ई-मेल आयडी तक्रारी नोंदविण्याच्या खास हेतूसाठी निश्चित करणे अनिवार्य केले आहे. | |